# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

'सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ'

## महाविद्यालय विकास विभाग

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर–४४० ००१, दुरध्वनी क्रमांक: ०७१२–२५२९९३२,२५२२३९०

फॅक्स नं. ०७१२–२५५५७०१, Email ID : infoarcollege@ymail.com


क्र.म.वि. ७७२४, दिनांकः–20/2/२०१८.

C/1498

प्रति,

अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
संस्थेअंतर्गत सर्व संलग्नीत महाविद्यालये,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,नागपूर विद्यापीठ,नागपूर.

**विषयः–श्री वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दि. २७ फेब्रुवारी हा जन्मदिन ''मराठी भाषा गौरव दिन'' म्हणून साजरा करण्याबाबत.**

**संदर्भः–१. शासन परिपत्रक क्र. बैठक/२४१३/(०७/१७ प्र.क्र.०४./१७) समन्वय, दि. २०–०१–२०१८.**

२.मा.शिक्षण संचालक, पुणे यांचे पत्र क्र. उशिस/**मराठी भाषा गौरव दिन/मवि–१/२०१७/११६२, दि.२५–१–२०१८.**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भीय शासन परिपत्रकात नमुद केल्यानुसार आपणांस कळविण्यात येते की, **ज्ञानपीठ पुरस्कार विजेते श्रेष्ठ कवी श्री वि.वा. शिरवाडकर, उर्फ कुसुमाग्रज** यांनी मराठी भाषेच्या साहित्य क्षेत्रामध्ये अत्यंत मोलाचे योगदान दिले असून मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी त्यांनी घेतलेल्या अथक परिश्रमाचा एक भाग म्हणून व मातृभाषेचा गौरव म्हणून श्री वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दि. २७ फेब्रुवारी हा जन्मदिन ''मराठी भाषा गौरव दिन'' म्हणून सन २०१३ पासून राज्यातील उच्च शिक्षण संस्था/महाविद्यालये/विद्यापीठे यामध्ये मोठया प्रमाणात व उत्साहात साजरा करण्यांत येतो. तशाच प्रकारे यावर्षी देखिल **श्री वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दि. २७ फेब्रुवारी २०१८ हा जन्मदिन ''मराठी भाषा गौरव दिन'' म्हणून** महाविद्यालयामध्ये साजरा करण्याबाबत शासन परिपत्रकातील सुचनेनुसार योग्य ती कार्यवाही करावी आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास तसेच विद्यापीठास पाठवावा. आपल्या सुलभ संदर्भाकरिता **शासन परिपत्रकाची प्रत** सोबत जोडलेली आहे.

कळावे.

आपला,

(प्रदीप बिनीवाले)
उपकुलसचिव (अति.कार्य)